सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती**
**कॅम्प अमरावती ४४४ ६०२**
**(गृह विभाग)**
☎: ०७२१-२६६२०२५/२६६२४९३ फॅक्स : ०७२१-२६६२८४३
Website :- www.amravati.nic.in
Email:- homebranch.collamt@gmail.com

क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि- 245 /२०२० दिनांक :- 23 /०३/२०२०

**वाचा :-** १.आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५
२. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७
३. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/१४४ आदेश/कावि-२४३/२०२० दि. २२/०३/२०२०

**आदेश**

कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशात तसेच राज्यामध्ये प्रभावी उपाययोजना करण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५ तसेच साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये अमरावती जिल्हयाचे क्षेत्रातील कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना एक भाग म्हणुन नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी संदर्भिय क्र. ३ अन्वये अमरावती जिल्हयातील शहरी भागात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) नुसार संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे.

सदर आदेशाची प्रभावीपणे व काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याकरीता संचारबंदी लागू करण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये जिवनावश्यक वस्तु उदा. धान्य, किराणा, फळे, भाजीपालाची विक्री स्थानिक स्वराज्य संस्था यांनी ठरवून दिलेल्या जागेवरच करण्यात यावी. तसेच सदर ठिकाणी १०० मीटर परिसरामध्ये ५ पेक्षा जास्त किरकोळ विक्रेते असणार नाही याची दक्षता घ्यावी. धान्य, किराणा, फळे, भाजीपाला या जिवनावश्यक वस्तुंची विक्री ही सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० वा. पर्यंतच करण्यात यावी. ही वेळ मर्यादा औषधी केंद्र, रुग्णालये यांना लागू असणार नाही. उपरोक्त संदर्भिय कलम १४४ च्या आदेशाची तसेच या आदेशाची मोठया प्रमाणात जनजागृती होण्याकरीता ध्वनीक्षेपकाव्दारे तसेच Public Address System व्दारे प्रसिध्दी देण्यात यावी.

अमरावती जिल्हयाच्या सिमेवरुन प्रवेश करणाऱ्या वाहनांना प्रतिबंध करण्याकरीता अमरावती जिल्हयालगत असलेल्या सर्व सिमावर्ती ठिकाणी पोलीस अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांनी नाकेबंदी करुन प्रवेश करण्याकरीता प्रतिबंध करावा. तसेच पोलीस आयुक्त (शहर) अमरावती यांनी अमरावती शहरामध्ये प्रवेश करणारी



Scanned by CamScanner

वाहने ही शहराच्या सिमेवर रोखून त्यांची नाकेबंदी करावी व त्यांना शहरात येण्यापासून प्रतिबंध करण्यात यावा. यामध्ये जिवनावश्यक वस्तुंची (पेट्रोलिअम पदार्थ, दुध, भाजीपाला, औषधी, धान्य, वैद्यकीय उपकरणे, प्रसारमाध्यमे इ.) वाहतूक करणारी वाहने वगळण्यात यावी. जिल्हा, शहर व गावचे कार्यक्षेत्रातुन आवश्यक व तातडीच्या वैद्यकीय, जिवनावश्यक व आपात्कालीन परिस्थिती व्यतीरिक्त नागरिक व वाहनांना बाहेर जाण्यास व आत प्रवेश देऊ नये अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून सर्व प्रकारची प्रवासी व माल वाहतुक करणारी वाहने, बस, खाजगी कार, टेंपो ट्रॅव्हलर, ट्रक, काळी पिवळी जिप, अशी सर्व हलकी, मध्यम व अवजड वाहने, ऑटो रिक्षा, शेअर रिक्षा, दुचाकी अशा सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतुकीस प्रतिबंध करण्यात यावा. सदर आदेशाची अंमलबजावणी करतांना पोलीस विभागाने प्रादेशिक परिवहन विभाग, महामार्ग पोलीस विभाग यांचेशी समन्वय साधून कार्यवाही करावी. या आदेशाबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी करुन तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

सदरचे आदेश हे दिनांक ३१/०३/२०२० चे २४.०० वा. पर्यंत लागू राहतील. सदरहू आदेश आज दिनांक २३/०३/२०२० रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला.

DISTRICT MAGISTRATE

(शैलेश नवाल)
**जिल्हादंडाधिकारी अमरावती**

प्रतिलिपी:-

१. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. पोलीस आयुक्त (शहर) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
३. पोलीस अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
४. आयुक्त, महानगरपालीका अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
६. प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
७. अधिक्षक, महामार्ग पोलीस अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
८. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
९. उपविभागीय दंडाधिकारी -------------------सर्व यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१०. तालुका दंडाधिकारी ----------------------सर्व यांना माहिती व कार्यवाहीकरीता
११. मुख्याधिकारी नगर परिषद/पंचायत ---------------------सर्व यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१२. जिल्हा माहिती अधिकारी अमरावती यांना माहिती व उचित प्रसिध्दीकरीता रवाना.

**/- सदर आदेशास अमरावती जिल्हयामधील स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.**

२३/३

**जिल्हादंडाधिकारी अमरावती**

Scanned by CamScanner